THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH APRIL 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १८९० रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—**

### सन १८९० चा आक्ट ५ वा.

**सन १८७८ चा हिंदुस्तानचा जंगलाचा आक्ट आणि सन १८८१ चा ब्रह्मदेशाचा जंगलाचा आक्ट हे सुधारण्याबाबद.**

ज्यापेक्षां सन १८७८ चा हिंदुस्तानचा जंगलाचा आक्ट आणि सन १८८१ चा ब्रह्मदेशाचा जंगलाचा आक्ट हे सुधारणें योग्य आहे, त्यापेक्षां हल्लीं येणेंप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१ (१) या आक्टास सन १८९० चा जंगलाचा आक्ट असें ह्मणावें; आणि — सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

### सन १८७८ चा हिंदुस्तानचा जंगलाचा आक्ट.

२. (१) सन १८७८ चा हिंदुस्तानचा जंगलाचा आक्ट याच्या २ऱ्या कलमांत "झाड" याच्या व्याख्येबदल पुढील व्याख्या दाखल करावी. ती येणेंप्रमाणें:— — १८७८ चा आक्ट ७, कलम २ याची सुधारणा.

" 'झाड' या शब्दांत पाम [ताड वगैरे], बांबू, खूंट, झुडुप व वेत यांचा समावेश होतो:".—

(२) याच कलमांत "सुतारकामी लांकडें" याच्या व्याख्येबदल पुढील व्याख्या दाखल करावी. ती येणेंप्रमाणें:—

" 'सुतारकामी लांकडें' या शब्दांत झाडें पडलीं अगर तोडलीं असतील तेव्हां यांचा, आणि सर्व लांकडें, तीं मग कोणत्याहि कारणासाठीं कापलेलीं, घडलेलीं अगर पोखरलेलीं असोत किंवा नसोत, यांचा समावेश होतो:".

(३) त्याच कलमांत "जंगलाचें उत्पन्न" याच्या व्याख्येबद्दल पुढील व्याख्या दाखल करावी. ती येणेंप्रमाणें:—

" 'जंगलाचें उत्पन्न' या शब्दांत,—

(अ) सुतारकामी लांकडें, कोळसा, कूचुक [रबर], लांकडाचें तेल, राळ, आपोआप बनलेलें वार्निश, साल, लाख, मोहाचीं फुलें व हिरडा या वस्तु, मग त्या जंगलांत सांपडलेल्या अगर जंगलांतून आणलेल्या असोत अगर नसोत, यांचा; आणि

(ब) खालील वस्तु, ह्मणजे,

(१) झाडें आणि त्यांचीं पानें, फुलें व फळें आणि अगोदर सांगण्यांत आले नसतील ते झाडांचें इतर भाग अगर उत्पन्न,

(२) झाडें नसणारे रोंप (गवत, वेली, रीड [बोरू वगैरे] व शेवाळ हीं धरून) व अशा रोपांचे सर्व भाग अगर उत्पन्न,

(३) जंगली प्राणी, आणि कातडीं, सुळेदांत, शिंगें, हाडें, रेशीम, ककून [कोश], मध व मेण आणि प्राण्याचे इतर सर्व भाग अगर उत्पन्न, आणि

(४) पीट*, जमिनीच्या सपाटीची माती, खडक, आणि खनिज पदार्थ (चुनखडी, ल्याटेरैट [एका जातीचा दगड], खनिज तेलें व खाणींपासून उत्पन्न होणारे सर्व पदार्थ धरून),

या वस्तु जेव्हां जंगलांत सांपडतील अगर जंगलांतून आणण्यांत येतलि तेव्हां त्यांचा,—

समावेश होतो:".

१८७८ चा आक्ट ७, कलम ४ याची सुधारणा.

३. सदहू आक्टाच्या ४ थ्या कलमाची रकम (ब) हिच्याबद्दल पुढील रकम दाखल करावी. ती येणेंप्रमाणें:—

" (ब) अशी जमीन कोठें आहे तें व तिच्या सीमा हीं जितकीं बरोबर रीतीनें निर्दिष्ट करवतील तितकीं करणें; आणि".

१८७८ चा आक्ट ७, कलम ५ यांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. सदहू आक्टाच्या ५ व्या कलमाच्या शेवटीं "नवीन मोकळा करूं नये" या शब्दांच्या ऐवजीं "नवीन मोकळा करणें असेल तो फक्त स्थानिक सरकारानें ठरविलेल्या कानूंवरहुकुम करावा." हे शब्द दाखल करावे.

१८७८ चा आक्ट ७, कलम ६ याची सुधारणा.

५. सदहू आक्टाच्या ६ व्या कलमाची रकम (अ) हिच्याबद्दल पुढील रकम दाखल करावी. ती येणेंप्रमाणें:—

"(अ) योजलेलें जंगल कोठें असावयाचें तें व त्याच्या सीमा हीं जितकीं बरोबर रीतीनें निर्दिष्ट करवतील तितकीं करणें;".

१८७८ चा आक्ट ७, कलम ९ यापुढें नवीन कलम दाखल करणें.

६. सदहू आक्टाच्या ९ व्या कलमापुढें खालील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

जागा पालटून लागवड करण्याच्या वहिवाटीसंबंधीं दाव्याची व्यवस्था.

"९ अ. (१) जागा पालटून लागवड करण्याच्या वहिवाटीसंबंधीं दावा केला असेल त्या प्रसंगीं, अशा दाव्याबद्दलचा व ज्या कोणत्याहि स्थानिक नियमाअन्वयें अगर हुकुमाअन्वयें अशी वहिवाट चालू असेल अगर तिचें नियमन करण्यांत येत असेल तो नियम अगर हुकुम यांबदलचा तपशील फारेस्ट सेटलमेंट आफिसरानें लि-

* हा एक झाडांचीं मुळें वगैरे कुजून बनलेला पदार्थ असून त्याचा जळणाच्या कामीं उपयोग करतां येतो.

हून घेऊन तो, अशी वहिवाट सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं चालू ठेवण्यास परवानगी द्यावी अगर ती मना करावी याबाबदच्या आपल्या अभिप्रायानिशीं स्थानिक सरकारास सादर करावा.

(२) असा तपशील व अभिप्राय आल्यावर स्थानिक सरकारास, अशी वहिवाट सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं चालू ठेवण्याविषयीं अगर मना करण्याविषयीं हुकुम करण्याचा अधिकार आहे.

(३) जर अशी वहिवाट सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं चालू ठेवण्याबदल परवानगी दिली असेल, तर ती वहिवाट चालविण्याला सवड देण्यासाठीं 'फारेस्ट सेटलमेंट आफिसरास पुढीलप्रमाणें व्यवस्था करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे त्यानें--

(अ) ज्या जमिनीच्या संबंधानें ठराव करावयाचा तिच्या सीमा फिरवून, दावा सांगणारांच्या कारणांकरितां पुरेशी, योग्य प्रकारची व वाजवी रीतीनें सोईवार अशा ठिकाणीं असणारी जमीन सोडून द्यावी, किंवा

(ब) ज्या जमिनीच्या संबंधानें ठराव करावयाचा तिचे कांहीं भाग निराळे निर्दिष्ट करवून दावा सांगणारांस त्यांत, तो सांगेल तशा शर्तीअन्वयें जागा पालटून लागवड करण्याची परवानगी द्यावी.

या पोट-कलमाअन्वयें जी कोणतीहि व्यवस्था करण्यांत येईल तिजबदल अगोदर स्थानिक सरकारची मंजूरी घेतली पाहिजे.

(४) जागा पालटून लागवड करण्याबदल परवानगी दिली असेल ती विशेष रीतीनें दिलेल्या अधिकाराप्रमाणें असून तो अधिकार स्थानिक सरकाराकडून निर्बंध ठेवला जाण्यास, कमी केला जाण्यास व बंद केला जाण्यास पात्र आहे असें समजावें.

७. सदर्हू आक्टाच्या २९ व्या कलमाची रकम (ब) हिच्याबदल पुढील रकम दाखल करावी. ती येणेंप्रमाणें: — १८७८ चा आक्ट ७, कलम २५ याची सुधारणा.

"(ब) राखलेले जंगलास आग लावील, किंवा तशा जंगलास धोका पोहंचे अशा रीतीनें, स्थानिक सरकारानें केलेल्या कोणत्याहि कानूविरुद्ध, कोणताहि विस्तव पेटवील अगर पेटता राहूं देईल;".

८. (१) सदर्हू आक्टाच्या ७ व्या बाबीच्या सदरांत "सुतारकामी लांकडांवरील ड्युटीबाबद" या शब्दांच्या बदला "सुतारकामी लांकडें व जंगलाचें इतर उत्पन्न यांवरील ड्यूटीबाबद" हे शब्द दाखल करावे. १८७८ चा आक्ट ७, बाबी ७ व ८ यांची सुधारणा.

(२) सदर्हू आक्टाचें कलम ३९ याच्या पहिल्या व शेवटच्या पारिग्राफांत "सुतारकामी लांकडांवर" या शब्दांच्या पुढें "किंवा जंगलाच्या इतर उत्पन्नावर" हे शब्द दाखल करावे; आणि त्याच कलमाच्या रकमा (अ) व (ब) यांच्या बदला पुढील रकमा अनुक्रमें दाखल कराव्या. त्या येणेंप्रमाणें:—

(अ) जीं सुतारकामी लांकडें किंवा जंगलाचें इतर उत्पन्न ब्रिटिश इंडियांत उत्पन्न झालीं आहेत व ज्यांबाबद सरकारास कोणताहि हक्क आहे तीं सुतारकामी लांकडें किंवा जंगलाचें इतर उत्पन्न.

(ब) जीं सुतारकामी लांकडें किंवा जंगलाचें इतर उत्पन्न ब्रिटिश इंडियाचे सरहद्दीपलीकडील कोणत्याहि जागेहून आणलीं असतील तीं सुतारकामी लांकडें किंवा जंगलाचें इतर उत्पन्न.

(३) सदर्हू आक्टाच्या ४१ व्या कलमाची रकम (अ) हींत "व" या शब्दाच्या बदला "अगर" हा शब्द दाखल करावा.

१८७८ चा आक्ट ७, कलम ४१ याच्या शेवटीं जास्त मजकूर दाखल करणें.

(४) सदर्हू आक्टाचें कलम ४१ याच्या शेवटीं पुढील मजकूर दाखल करावा तो येणेंप्रमाणें:--

"या कलमाअन्वयें केलेली अमुक कानू, अमुक वर्गांतील सुतारकामी लांकडें अगर जंगलाचें इतर उत्पन्न यांस किंवा अमुक स्थानिक क्षेत्रास लागू होणार नाहीं असें फर्माविण्याचा स्थानिक सरकारास अधिकार आहे."

१८७८ चा आक्ट ७, कलम ४७ याची सुधारणा.

९. सदर्हू आक्टाच्या ४७ व्या कलमांत "दोन महिन्यांचे आंत" या शब्दांच्या बदल "तीन महिन्यांचे आंत" हे शब्द दाखल करावे.

१८७८ चा आक्ट ७, कलम ४८ यांत जास्त शब्द दाखल करणें.

१०. सदर्हू आक्टाच्या ४८ व्या कलमांत "कोणताहि बोजा" या शब्दांपूर्वी "ज्यानें बातलेला नसेल तसा" हे शब्द जास्त दाखल करावे.

१८७८ चा आक्ट ७, कलम ५६ याची सुधारणा.

११. सदर्हू आक्टाच्या ५६ व्या कलमांत "आपणास" या शब्दाच्या बदला "अशा माजिस्ट्रेटास" हे शब्द दाखल करावे.

१८७८ चा आक्ट ७, कलम ६३ याची सुधारणा.

१२. सदर्हू आक्टच्या ६३ व्या कलमांत "त्या खटल्यांत हुकुमत असणारे माजिस्ट्रेटापुढें" या शब्दांपुढें "किंवा अगदीं जवळचें पोलीस ठाणें स्वाधीन असणाऱ्या अमलदाराकडे" हे शब्द जास्त दाखल करावे.

१८७८ चा आक्ट ७, कलम ६७ याची सुधारणा.

१३. सदर्हू आक्टाच्या ६७ व्या कलमाबदल पुढील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:--

अपराधाबदल तोडजोड करण्याचा अधिकार.

"६७. (१) स्थानिक सरकार,सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, वेळोवेळीं एकाद्या फारेस्ट आफिसरास त्याच्या नांवानें किंवा अमुक हुद्दा धारण करणारा ह्मणून पुढीलप्रमाणें अधिकार देण्यास, ह्मणजे--

(अ) ६१व्या किंवा ६२ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या अपराधाखेरीज जंगलासंबंधी इतर कोणताहि अपराध केल्याचा ज्या कोणत्याहि मनुष्यावर वाजवी रीतीनें गुमान असेल त्या मनुष्याकडून, अशा मनुष्यानें जो अपराध केल्याविषयीं गुमान असेल त्या अपराधाबदल मोबदला ह्मणून कांहीं पैक्याची रकम घेण्याचा, आणि

(ब) जप्त करून सरकारदाखल केला जाण्यास पात्र ह्मणून कोणताहि माल धरला असेल तेव्हां तो, अशा आफिसरानें आकारलेली त्याची किंमत दिली असतां, सोडून देण्याचा,

अधिकार देण्यास मुखत्यार आहे.

(२) प्रसंगाप्रमाणें, सदरीं सांगितलेली पैक्याची रकम किंवा किंमत किंवा त्या दोन्ही सदर्हू आफिसराकडे भरल्या असतां गुमान असलेला मनुष्य अटकेंत असल्यास त्यास सोडून द्यावें, माल धरला असल्यास तो सोडून द्यावा, आणि पुढें कोणतेंहि काम अशा मनुष्यावर अगर मालाबाबद चालवूं नये.

(३) एकाद्या फारेस्ट आफिसरास या कलमाखालीं अधिकार देणें तो, असा आफिसर रेन्जरच्या दर्जाखालील दर्जाचा नसून, त्यास दरमाहा निदान शंभर रुपये पगार मिळत असल्याखेरीज देऊं नये, आणि पोट-कलम (१), रकम (अ) याखालीं मोबदला ह्मणून घेतलेली पैक्याची रकम कोणत्याहि प्रसंगीं पन्नास रुपयांहून जास्त असतां कामा नये."

१८७८ चा आक्ट ७, कलम ८३ यापुढें नवीन कलम दाखल करणें.

१४. सदर्हू आक्टाच्या ८३ व्या कलमापुढें खालील कलम दाखल करावें, तें येणेंप्रमाणें:--

“८४. जेव्हां कोणताहि मनुष्य या आक्टाखालील कोणत्याहि कानूनरहुकुम, कोणताहि काम किंवा कृत्य करण्याबदल कोणताहि दस्तऐवज करून देऊन आपणास बद्ध करील, किंवा आपण, अगर आपण आणि आपले नोकर व गुमास्ते अमुक कृत्य करणार नाहींत असा कोणत्याहि दस्तऐवजावरून करार करील त्या बाबतींत, अशा दस्तऐवजांतील कोणत्याहि शर्ती तोडल्या असतां, त्या तोडण्याबदल द्यावयाची ह्मणून जी रकम त्यांत सांगितली असेल ती सर्व रकम, सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट याच्या ७४ व्या कलमांत कोणताहि ठराव असला तथापि, त्यापासून जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार आहे.” खताअन्वयें येणें झालेली गुन्हेगारी वसूल करण्याबाबद.

[ कलमें १९— २२ मुंबई इलाक्यास लागू नाहींत. ]

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

# लेजिस्लेटिव डिपार्टमट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ७ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यांवरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९० चा आक्ट ६ वा.

### धर्मार्थ कामांसाठीं जिम्म्यानें धारण केलेली मालमत्ता सोंपून देणें व तिची वहिवाट चालविणें यांबाबद ठराव करण्याविषयीं आक्ट.

धर्मार्थ कामांसाठीं जिम्म्यानें धारण केलेली मालमत्ता सोंपून देणें व तिची वहिवाट चालविणें यांबाबद ठराव करणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें यावरून कायदा ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९० चा धर्मार्थ देणग्यांबाबद आक्ट असें ह्मणावें.

(२) तो, उत्तर ब्रह्मदेश व ब्रिटिश बलुचिस्तान धरून सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहे; आणि

व्याख्या.

(३) तो, सन १८९० च्या आक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

२. या आक्टांत, "धर्मार्थ काम" या संज्ञामध्यें गरीब लोकांस मदत, शिक्षण, वैद्यकीय मदत आणि साधारण सार्वजनिक उपयोगाच्या कोणत्याहि इतर गोष्टीचा प्रसार यांचा समावेश होतो, परंतु नुस्त्या धर्मसंबंधी शिक्षणाचा अगर उपासनेच्या मार्गाचा त्यांत समावेश होत नाहीं.

धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररची नेमणूक व संस्थापना.

३. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, सरकारच्या एकाद्या नोकरास त्याच्या हुद्द्याच्या नांवानें, कोणत्याहि स्थानिक सरकारच्या अमलाखालील मुलुखांसाठीं धर्मार्थ देणग्यांचा ट्रेझरर ह्मणून नेमण्यास मुखत्यार आहेत.

(२) असा ट्रेझरर, या आक्टाच्या अधिकाराअन्वयें जंगम किंवा स्थावर मालमत्ता घेण्याच्या, धारण करण्याच्या व दुसऱ्याच्या नांवावर करून देण्याच्या कारणांसाठीं, स्थानिक सरकारच्या अमलाखालील मुलुखांसाठीं धर्मार्थ देणग्यांचा ट्रेझरर या नांवानें एकव्यक्तिरूप संस्थापित मंडळी आहे असें समजावें आणि त्यास अशी ट्रेझररच्या नात्यानें अविच्छिन्न स्थानापन्नत्व असून सदहू संस्थापित नांवाचा शिक्का असेल असें समजावें, आणि त्यास व त्याजवर सदहू संस्थापित नांवानें दावा करण्याचा अधिकार आहे.

ट्रेझररकडे मालमत्ता सोंपून देण्याचे हुकुम.

४. (१) कोणतीहि मालमत्ता धर्मार्थ कामासाठीं जिम्म्यानें धारण केली असेल किंवा जिम्म्यानें लावावयाची असेल तेव्हां, स्थानिक सरकारास योग्य वाटलयास, तें सरकार, या आक्टांत पुढें सांगितलेल्या रीतीनें अर्जी आली असतां, या कलमांतील इतर ठरावांस पात्र राहून सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून असा हुकुम करण्यास मुखत्यार आहे कीं, सदहू मालमत्ता, स्थानिक सरकार व अर्जी करणार मनुष्य किंवा मनुष्यें यांच्या दरमियान त्या मालमत्तेचा अगर तिच्या उत्पन्नाचा वि-

नियोग करण्याच्या संबंधानें ज्या शर्ती कबूल करण्यांस येतील त्या शर्तींवर, धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे सोंपून देण्यांत यावी; आणि मग त्याप्रमाणें सदर्हू मत्ता सदर्हू-प्रमाण सोंपून दिली आहे असें समजावें.

(२) या कलमाअन्वयें कोणतीहि मालमत्ता धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे सोंपून देण्यांत येईल तेव्हां त्या मालमत्तेच्या संबंधाचे मालकीच्या हक्काचे सर्व दस्त-ऐवज मिळण्याचा त्याला हक्क आहे.

(३) स्थानिक सरकारानें—

(अ) हिंदुस्तान सरकारच्या किंवा ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या प्रामिसरी नोटी, डिबेंचर, स्टाक व इतर सिक्युरिटी,

(i) हिंदुस्तानच्या महसुलावर बादशाही पार्लमेंटानें बोजा घालून दिलेले बांड, डिबेंचर व आन्युइट्या,

(क) ज्यावरील व्याजाबद्दल हिंदुस्तानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांनीं हमी दिली असेल असे रेल्वे किंवा इतर कंपन्यांचे स्टाक, डिबेंचर किंवा शेअर,

(ड) ब्रिटिश इंडियांत स्थापलेल्या कायदे करणाऱ्या मंडळीच्या कोण-त्याहि आक्टावरून दिलेले अधिकार चालवून कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यानें किंवा त्याच्या वतीनें काढलेले डिबेंचर किंवा पैक्याच्या इतर सिक्युरिटी,

(इ) या बाबतींत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं हुकुम करून त्यावरून ज्या सिक्युरिटीबद्दल स्पष्टपणें अधिकार दिला असेल ती सिक्युरिटी,

यांशिवाय पैक्याच्या इतर कोणत्याहि सिक्युरिटी धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे सोंपून देण्याविषयीं पोट-कलम (१) याअन्वयें हुकुम करतां कामा नये.

(४) कोणतीहि मालमत्ता धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझरराकडे सोंपून देण्याच्या या कलमाखालच्या कोणत्याहि हुकुमात, त्या ट्रेझररनें त्या मालमत्तेची वहिवाट चालवावी असें अगर त्या मालमत्तेच्या वहिवाटीच्या संबंधानें ट्रस्टींचें काम चालवावें असें फर्मावण्यात येऊं नये अगर त्यांत तसें फर्माविण्यांत आलें आहे असें कोणीं समजूं नये.

**ट्रेझररकडे सोंपून दिलेल्या मालमत्तेची वहिवाट चालवि-ण्याच्या पद्धति.**

९. (१) स्थानिक सरकारास योग्य वाटल्यास तें सरकार, या आक्टांत पुढें सांगितलेल्या रीतीनें अर्ज आला असतां, अर्ज करणार मनुष्य किंवा मनुष्यें यांच्या संमतीनें, धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे सोंपून दिलेल्या किंवा सोंपून द्यावयाच्या कोणत्याहि मालमत्तेची वहिवाट चालविण्याची पद्धति ठरविण्यास आणि अशा पद्ध-तींत, त्या मालमत्तेची वहिवाट चालविण्यासाठीं, एका अगर अनेक मनुष्यांस त्यांच्या नांवानें अगर हुद्यानें नेमण्यास मुखत्यार आहे; मात्र तो मनुष्य तो ट्रेझरर नसावा अगर त्या मनुष्यांत त्या ट्रेझररचा समावेश करूं नये.

(२) या आक्टांत यापुढें सांगितलेल्या रीतीनें अर्ज आला असतां, अर्ज कर-णार मनुष्य किंवा मनुष्यें यांच्या संमतीनें, स्थानिक सरकारास योग्य वाटल्यास तें सरकार, या कलमाअन्वयें ठरविलेल्या कोणत्याहि पद्धतींत फेरफार करण्यास अगर त्या पद्धतीऐवजीं दुसरी एकादी पद्धति ठरविण्यास मुखत्यार आहे.

(३) या कलमाअन्वयें ठरविलेली, फेरफार केलेली अगर नवीन दाखल केले-ली पद्धति, या कलमाचे इतर ठरावांस पात्र राहून, या बाबतींत स्थानिक सरकार

नेमील त्या दिवशीं अमलांत येईल, आणि ती ज्या मालमत्तेच्या संबंधाची असल ती मालमत्ता धमार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे सोंपलेली राहील तोंपर्यंत किंवा तीत फेरफार करण्यांत येईल तोंपर्यंत किंवा तिच्या ऐवजीं दुसरी तशीच पद्धति ठरविली जाईल तोंपर्यंत, अमलांत राहील असें समजावें.

(४) अशी पद्धति अमलांत येईल तेव्हां तिच्या योगानें, तिच्या विषयाच्या संबंधाचा कोणताहि हुकुमनामा किंवा हुकुम, तो तिला कोणत्याहि प्रकारें विरुद्ध असेल त्यापुरता, रद्द होईल असें समजावें, आणि तिच्या व्यवहारोपयोगीपणाबद्दल कोणत्याहि कोर्टानें शंका घेतां कामा नये; आणि कोणत्याहि कोर्टानें त्या पद्धतीच्या ठरावाविरुद्ध अगर कोणत्याहि प्रकारें त्या पद्धतीस विरुद्ध अगर तिच्या बाहेर, ती पद्धति ज्या मालमत्तेच्या संबंधाची असेल तिच्या वहिवाटीच्या संबंधाचा हुकुमनामा अगर हुकुम देतां कामा नये.

(५) अशी पद्धति ठरवितांना जिम्मा देणाराच्या इच्छा समजूं शकतील तेथवर, व स्थानिक सरकारच्या मताप्रमाणें वाजवी रीतीनें त्या जेवढ्या अमलांत आणतां येतील तेवढ्या, अमलांत आणिल्या पाहिजेत.

(६) धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडे आधींच सोंपून दिलेली नाहीं अशा मालमत्तेचा वहिवाट चालविण्याबद्दल या कलमाअन्वयें एखादी पद्धत ठरविण्यांत आली ह्मणजे, ती सदर्हू मालमत्ता सदर्हूप्रमाणें सोंपून दिली जाई तोंपर्यंत, अमलांत आणतां कामा नये असें समजावें.

६. (१) सदरील शेवटच्या दोन कलमांत सांगितलेली अर्जी,-- सोंपून देण्याचे हुकुम व पद्धति यांसाठीं अर्जी करण्याची रीति.

(अ) मालमत्ता धर्मार्थ कामासाठीं आधींच जिम्म्यानें धारण केली असेल तर, त्या जिम्म्यानें दिलेल्या मालमत्तेची वहिवाट चालविणाऱ्या मनुष्यानें, किंवा अशी वहिवाट चालविणारे एकाहून अधिक मनुष्य असतील तर त्या मनुष्यांनीं अगर त्यांपैकीं निमेहून अधिक मनुष्यांनीं केली पाहिजे, आणि

(ब) मालमत्ता अशा कामासाठीं जिम्म्यानें लावावयाची असेल तर, त्याप्रमाणें लावावयाची योजना करणाऱ्या मनुष्यानें किंवा मनुष्यांनीं केली पाहिजे.

(२) या कलमाच्या कारणांसाठीं, धर्मार्थ कामासाठीं जिम्म्यानें धारण केलेल्या मालमत्तेच्या मयत ट्रस्टीचें मृत्युपत्र चालविणारास, किंवा वहिवाट चालविणारास, त्या जिम्म्यानें दिलेल्या मालमत्तेची वहिवाट चालविणारा मनुष्य मानलें पाहिजे.

७. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, कलमें ४ व ५ यांवरून स्थानिक सरकारास दिलेले सगळे किंवा त्यांपैकीं कोणतेहि अधिकार चालविण्यास मुखत्यार आहेत. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं स्थानिक सरकारचे अधिकार चालविणें.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कोणत्याहि मालमत्तेच्या संबंधानें सदर्हू अधिकारांपैकीं कोणतेहि अधिकार चालविण्याचा आपला इरादा स्थानिक सरकारास दर्शविला ह्मणजे त्या सरकारानें त्यांची पूर्वीं मंजुरी घेतल्यावांचून ते अधिकार त्या मालमत्तेच्या संबंधानें चालवूं नयेत.

८. (१) या आक्टांतील ठरावांस पात्र राहून, धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररनें, ज्या कोणत्याहि जिम्म्यानें दिलेल्या देणगींतील कोणतीहि मालमत्ता या आक्टाअन्वयें त्याकडे विवक्षित काळीं सोंपून दिली असेल त्या देणगीची, असा ट्रेझरर या नात्यानें वहिवाट करतां कामा नये. ट्रेझररचा केवळ ट्रस्टीपणा.

(२) अशा ट्रेझररनें, सदर्हूप्रमाणें विवक्षित काळीं सोंपून दिलेल्या दरेक मालमत्तेचा जो भाग पैक्याच्या सिक्युरिटींच्या रूपानें असेल त्याचा निराळा हिशेब ठेविला पाहिजे, आणि अशा मालमत्तेच्या अगर तिच्या उत्पन्नाचा विनियोग, ४ थ्या कलमाअन्वयें सोंपून देण्याच्या हुकुमांत किंवा ९ व्या कलमाअन्वयें कोणतीहि पद्धति ठरविली असल्यास त्या पद्धतींत किंवा त्या दोनही दस्तऐवजांत त्याबाबद केलेल्या ठरावाप्रमाणें केला पाहिजे.

(३) पैक्याच्या सिक्युरिटी खेरीज करून इतर कोणतीहि मालमत्ता सदर्हू प्रमाणें सोंपून दिली असेल त्या प्रसंगीं, अशा ट्रेझररनें, ज्या अधिकाऱ्याच्या हुकुमावरून त्याकडे ती मालमत्ता सोंपविण्यांत आली असेल त्याचा आपणास जो कोणताहि विशेष हुकुम मिळेल त्यास पात्र राहून, जिम्म्यानें दिलेल्या देणगीची वहिवाट करणाऱ्या मनुष्यांकडे ती सोंपून दिली आहे असें समजून त्यांना ती मालमत्ता कबज्यांत घेण्याची, तिची व्यवस्था ठेवण्याची व तिजवर निर्बंध ठेवण्याची आणि तिच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याची परवानगी दिली पाहिजे.

ट्रेझररकडे सोंपून दिलेल्या मालमत्तांची यादी प्रतिवर्षी प्रसिद्ध करणें.

९. धर्मार्थ देणग्यांचे ट्रेझररनें, या आक्टाअन्वयें त्याकडे विवक्षित काळीं सोंपून दिलेल्या सर्व मालमत्तांची यादी आणि सदरील शेवटल्या कलमाची पोट-रकम (२) याअन्वयें त्यानें ठेविलेल्या सर्व हिशेबांचा गोषवारा, हीं, स्थानिक सरकार ठरवील तशा वेळीं स्थानिक सरकारी गॅझेटांत प्रतिवर्षी प्रसिद्ध करविलीं पाहिजेत.

ट्रेझररचीं कामें व अधिकार यांची इयत्ता.

१०. (१) धर्मार्थ देणग्यांचा ट्रेझरर हा नेहमीं एकटाच ट्रस्टी असेल; आणि असा ट्रेझरर या नात्यानें त्यानें या आक्टांतील ठरावांस अनुसरून नाहीं अशा कोणत्याहि इतर रीतीनें कोणतीहि मालमत्ता घेऊं नये किंवा धारण करूं नये, अगर, त्या ठरावांस पात्र राहून, त्याकडे सोंपून दिलेली कोणतीहि मालमत्ता, ती त्याजकडून काढून घेण्याविषयींच्या हुकुमनाम्यास अनुसरून चालण्याचा, किंवा ज्या अधिकाऱ्याच्या हुकुमावरून ती मालमत्ता त्याकडे सोंपून देण्यांत आली होती त्या अधिकाऱ्यानें त्या बाबतींत दिलेला हुकुम पाळण्याचा प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, त्यानें दुसऱ्याच्या नांवावर करून देतां कामा नये.

(२) सदर्हू प्रकारच्या हुकुमावरून, ट्रेझररकडे सोंपून दिलेली कोणतीहि मालमत्ता विकावयास किंवा इतर रीतीनें तिची व्यवस्था करावयास, आणि, तो हुकुम देणाऱ्या अधिकाऱ्याच्या मंजुरीनें, त्या मालमत्तेची विक्री किंवा इतर व्यवस्था करून झालेलें उत्पन्न, कलम ४, पोट-कलम (३), रकम (अ), (ब), (क), (ड) किंवा (इ) यांत सांगितलेल्या प्रकारच्या पैक्याच्या कोणत्याहि सिक्युरिटींत गुंतविण्यास अगर त्याची स्थावर मालमत्ता विकत घ्यावयास सांगण्याचा अधिकार आहे.

(३) स्थानिक सरकारच्या अगर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या या कलमाखालच्या कोणत्याहि हुकुमावरून धर्मार्थ देणग्यांच्या कोणत्याहि ट्रेझररकडून कोणतीहि मालमत्ता काढून घेतली जाईल तेव्हां, ती, तिची वहिवाट जो मनुष्य किंवा जे मनुष्य करीत होते त्याजकडे किंवा त्यांजकडे सोंपविण्यांत येईल, आणि ती मालमत्ता त्या ट्रेझररनें ज्या जिम्म्यावर धारण केलेली होती, त्याच जिम्म्यावर त्या मनुष्यानें अगर मनुष्यांनीं ती धारण केली पाहिजे.

कित्येक आकस्मिक प्रसंगीं ट्रेझररचा हुद्दा चालू राहण्याबाबद ठराव.

११. ज्या सरकारी नोकरास धर्मार्थ देणग्यांचा ट्रेझरर ह्मणून नेमलें असेल त्या नोकरानें धारण केलेला हुद्दा जरी कमी करण्यांत आल्यास किंवा त्या हुद्द्याचे नांवांत फेरबदल करण्यांत आल्यास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, सरकारच्या त्याचा किंवा दुसऱ्या नोकरास त्याच्या हुद्द्याच्या नांवानें असा ट्रेझरर नेमण्यास मुखत्यार

आहेत, आणि मग सदर्हू दुसऱ्या हुद्द्यावरील इसम हा या आक्टाच्या कारणांसाठीं सदर्हू पहिल्या हुद्द्यावरील इसमाचा स्थानापन्न आहे असें मानलें पाहिजे.

मालमत्ता एका ट्रेझररच्या नांवावरून दुसऱ्या ट्रेझररच्या नांवावर करणें.

१२. जर कोणत्याहि स्थानिक सरकारच्या अमलाखालील मुलुखांच्या हद्दींत फेरफार झाल्याकारणानें किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस असें वाटेल कीं धर्मार्थ देणग्यांच्या एका ट्रेझररकडे सोंपून दिलेली कोणतीहि मालमत्ता अशा दुसऱ्या ट्रेझररकडे सोंपून द्यावी, तर ती मालमत्ता त्याप्रमाणें सोंपून देण्यांत यावी असें फर्माविण्यास ते मुखत्यार आहेत; आणि मग ती मूळचीच या आक्टाअन्वयें त्या दुसऱ्या ट्रेझररकडे सोंपून दिली असल्यांप्रमाणेंच या आक्टाच्या कारणांसाठीं पूर्णपणें व कार्यसाधक रीतीनें त्याजकडे व त्याच्या स्थानापन्नांकडे सोंपली जाईल असें समजावें.

नमुने तयार करण्याचा व कानू करण्याचा अधिकार.

१३. या आक्टाअन्वयें चालविण्याच्या ज्या कोणत्याहि कामासाठीं नमुने ठरविलेले असावे असें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस वाटेल त्या कामांसाठीं नमुने तयार करण्यास, आणि

(अ) जी मालमत्ता दोन अगर अधिक स्थानिक सरकारांच्या अमलांतील मुलुखांत असेल त्या मालमत्तेच्या बाबतींत या आक्टाअन्वयें दिलेले अधिकार कोणत्या स्थानिक सरकारानें चालवावे तें ठरविण्यासाठीं,

(ब) धर्मार्थ देणग्यांच्या कोणत्याहि ट्रेझररकडे या आक्टाअन्वयें सोंपविलेल्या कोणत्याहि मालमत्तेबद्दल सरकारास द्यावयाच्या फी ठरविण्यासाठीं,

(क) कलम ९ अन्वयें कोणत्याहि पद्धति ठरविण्याच्या आधीं अगर त्यांत फेरफार करण्याच्या आधीं त्या पद्धति अगर ते फेरफार कोणत्या बाबतींत व कोणत्या रीतीनें प्रसिद्ध करावे त्याचें नियमन करण्यासाठीं,

(ड) धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररनीं कोणत्या नमुन्यांप्रमाणें जमाखर्च ठेवावा तें आणि असा जमाखर्च कोणत्या रीतीनें तपासला जावा तें ठरविण्यासाठीं, आणि

(इ) साधारणतः, या आक्टाचे उद्देश अमलांत आणण्यासाठीं,

या आक्टास अनुरूप असे जे कानू करणें त्यांस योग्य वाटेल ते कानू करण्यास ते मुखत्यार आहेत.

सरकार व ट्रेझरर यांचा बचाव.

१४. जें कोणतेंहि कृत्य या आक्टाअन्वयें केलें असेल किंवा केलें आहे असें ह्मणणें असेल त्या कृत्याच्या संबंधानें अगर या आक्टाअन्वयें सरकारावर पडलेलीं कामें करण्यांत हयगय अगर कसूर झाली ह्मणून ह्मणणें असेल त्यासंबंधानें, अगर या आक्टावरून सरकारास दिलेला कोणताहि अधिकार बजावण्याच्या अगर बजावण्यास चुकण्याच्या संबंधानें सरकाराविरुद्ध, किंवा मालमत्ता धर्मार्थ कामासाठीं जिम्मेस पात्र नाहीं अशा कारणावरून ती धर्मार्थ देणग्यांच्या ट्रेझररकडून काढून घ्यावयाची असेल, किंवा त्याजकडे सोंपलेल्या कोणत्याहि मालमत्तेची, अगर उत्पन्नाची नुकसानी किंवा गैरउपयोग झाला असेल त्या बाबतींत ती नुकसानी किंवा गैरउपयोग त्यानें बुद्धिपूर्वक केलेल्या हयगईनें किंवा कसुरीनें अगर त्यामुळें झालेला असल्यास त्याबद्दलचा बोजा त्याजवर घालावयाचा असेल, किंवा त्याबद्दल त्याला जबाबदार करावयाचा असेल, त्याशिवाय इतर प्रसंगीं त्या ट्रेझररविरुद्ध कोणताहि दावा चालवूं नये.

आडव्होकेट जनरल व आफिशियल ट्रस्टी यांबाबदचे ठराव कायम ठेवणें.

१५. इलाक्यांतील आडव्होकेट जनरलाचा कोणत्याहि धर्मादायासंबंधी अधिकार याबाबद, ३ ऱ्या जार्ज राजाच्या कारकीर्दीच्या ९३ व्या वर्षांतील स्टाट्यूटाच्या १५५ व्या च्याप्टराचें कलम १११, किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेला दुसरा कोणताहि कायदा, यांच्या, अगर आफिशियल ट्रस्टीकडे धर्मार्थ कामासाठीं मालमत्ता जिम्यानें सोंपून देण्याबाबदचीं सन १८६४ चा आक्ट नंबर १७ (आफिशियल ट्रस्टीचा हुद्दा स्थापन करण्याबाबद आक्ट) यांचीं कलमें ८, ९, १० व ११, यांच्या अमलास जेणेंकरून बाध येईल तसा या आक्टांतील कोणत्याहि ठरावाचा अर्थ होतो असें समजूं नये.

गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा निर्बंध ठेवण्याचा साधारण अधिकार.

१६. या आक्टावरून स्थानिक सरकारास मिळालेले अधिकार चालवितांना तें सरकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहील असें समजावें.

(सही.) एस. हार्वे जेम्स,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

---

# सन १८९० चा आक्ट १० वा.

## सन १८६७ चा आक्ट २५ वा सुधारण्याबाबत आक्ट.

सन १८६७ चा आक्ट २५ वा (छापण्याच्या प्रेसी व वर्तमानपत्रें यांजबद्द नियम ठरविण्याविषयीं व ब्रिटिश इंडियांत छापलेले बुकांच्या (पुस्तकांच्या) प्रती सांभाळून ठेवण्याविषयीं व सदर्हू प्रकारचीं बुकें नोंदण्याविषयीं आक्ट) हा सुधारणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे: —

सन १८६७ चा आक्ट २५ याच्या अवतरणांतील कांहीं अंश रद्द केला आहे.

१. सदर्हू आक्टाच्या अवतरणांतील "तीन तीन" हे शब्द यावरून रद्द केले आहेत.

सन १८६७ चा आक्ट २५, कलम १, याचा कांहीं अंश रद्द केला आहे.

२. सदर्हू आक्टाच्या १ ल्या कलमांतील "माजिस्ट्रेट" या शब्दाच्या व्याख्येंतले "व जस्टीस आफ धि पिसाचा" हे शब्द यावरून रद्द केले आहेत.

सन १८६७ चा आक्ट २५, कलम ६, याची सुधारणा.

३. सदर्हू आक्टाचें कलम ६ यांत, "अदालतीचे ज्या हे कोर्टाचे किंवा इतर कोर्टाचे अवल दिवानी फिर्यादी घेण्याचे मामुल हुकुमतीचे स्थलसीमेंत सदर्हू प्रकारचा इकरार केला असेल त्या हे कोर्टाचे किंवा इतर कोर्टाचे" या मजकुराऐवजीं, "सदर्हू इकरार जेथें केला असेल त्या जागीं अवल हुकुमत असणाऱ्या अदालतीच्या हे कोर्टाचे किंवा इतर मुख्य दिवानी कोर्टाचे" हा मजकूर दाखल करावा.

सन १८६७ चा आक्ट २५, भाग ३, याबदला नवीन भाग दाखल करणे.

४. सदर्हू आक्टाचा भाग ३ रा (कलमें ९, १० व ११) याच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा:—

---

### "भाग ३ रा.

### "बुकें देणें.

हा आक्ट अमलांत आल्यानंतर छापिलेल्या बुकांच्या प्रती सरकारास फुकट दिल्या पाहिजेत.

"९. हा आक्ट अमलांत आल्यानंतर जें जें बुक ब्रिटिश इंडियांत खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापण्यांत येईल त्या त्या सगळ्या बुकाच्या खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापलेल्या प्रती, त्यासंबंधाचे नकाशे, छाप अगर इतर चित्रें यांच्या ज्या उत्तम प्रती काढिल्या असतील त्यांप्रमाणें तयार केलेल्या व रंगविलेल्या त्या सर्व नकाशांच्या, छापांच्या अगर इतर चित्रांच्या प्रतींसुद्धां, (तें बुक प्रसिद्ध केलेलें असल्यास) तें बुक छापणारा व प्रसिद्ध करणारा यांच्या दरमियान कोणतीहि कबुलायत झालेली असली तरी, स्थानिक सरकार सरकारी गॅझेटांत वेळोवेळीं जाहिरनामा देऊन सांगेल त्या जागीं व त्या अमलदाराकडे सरकारास खर्च पडल्याशिवाय खालीं लिहिल्याप्रमाणें दिल्या पाहिजेत: ह्मणजे—

(अ) प्रत्येक बुकाच्या बाबतींत, तें छापखान्यांतून बाहेर काढिल्याच्या दिवसापासून एका क्यालेंडर महिन्याच्या आंत सदर्हू प्रकारची एक प्रत; आणि

(ब) अशा दिवसानंतर एका क्यालेंडर वर्षाच्या आंत स्थानिक सरकारानें तशा आणखी दोहोंपेक्षां जास्त नाहींत इतक्या प्रती देण्याबद्दल

छापणारास हुकुम केला तर, त्या छापणारास त्या स्थानिक सरकारानें त्याप्रमाणें हुकुम केल्याच्या दिवसापासून एका क्यालेंडर महिन्याच्या आंत, तें सरकार सांगेल त्याप्रमाणें तशी दुसरी एक प्रत अगर तशा दोन प्रती;

याप्रमाणें दिलेल्या प्रती बांधलेल्या असाव्या, किंवा शिवलेल्या असाव्या, किंवा दोरा घातलेल्या असाव्या, व ज्शा उत्तम कागदावर त्या बुकाच्या कोणत्याहि प्रती खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापिल्या असतील, तशा उत्तम कागदावर त्या प्रती खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापिलेल्या असाव्या.

"ज्या प्रसिद्ध करणारानें किंवा इतर मनुष्यानें त्या छापणारास बुक छापण्याचें काम दिलें असेल त्यानें, सदर्हू महिना संपण्यापूर्वीं माफक वेळांत, त्या छापणारास सदरील हुकुम मान्य करितां येण्यासाठीं, सदरीं सांगितल्याप्रमाणें तयार केलेले व रंगविलेले जे नकाशे, छाप आणि चित्रें जरूर असतील, तीं त्यास दिलीं पाहिजेत.

"या कलमाच्या पहिल्या भागांतील कोणताहि ठराव,—

(१) ज्याच्या पहिल्या अगर पूर्वींच्या कोणत्याहि आवृत्तीची एक प्रत ह्या आक्टाअन्वयें दिलेली असेल अशा कोणत्याहि बुकाच्या ज्या दुसऱ्या किंवा पुढच्या आवृत्तीमध्यें त्या बुकांतील मजकुरांत, नकाशांत, छापांत अगर इतर चित्रांत बिलकूल भर घातली नसेल किंवा फेरफार केला नसेल त्या दुसऱ्या अगर पुढच्या आवृत्तीस अगर

(२) या आक्टाचें कलम ९ यास अनुसरून नियमितकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याहि ग्रंथास

लागू नाहीं असें समजावें.

गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें दिलेल्या प्रतींबद्दल पावती दिली पाहिजे.

"१०. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें ज्या अमलदाराकडे बुकाची प्रत दिली जाईल त्यानें तिच्या बद्दल छापणारास लेखी पावती दिली पाहिजे.

कलम ९ अन्वयें दिलेल्या प्रतीची व्यवस्था करणे.

"११. या आक्टाच्या ९ व्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील (अ) रकमेअन्वयें दिलेल्या प्रतीची व्यवस्था, स्थानिक सरकार वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें करावी.

सदरीं सांगितलेल्या पारिग्राफांतील (ब) रकमेअन्वयें कोणतीहि एक प्रत दिली असल्यास, ती ब्रिटिश म्यूझिअम संग्रहालयास अगर सेक्रेटरी आफ स्टेट फार इंडिया यांजकडे पाठवावी, आणि दोन प्रती दिल्या असल्यास, त्या ब्रिटिश म्यूझिअम संग्रहालय आणि सदर्हू सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडे पाठवाव्या."

सन १८६७ चा आक्ट २५, कलमें १६ व १७, यांऐवजीं नवीन कलमें दाखल करणें.

९. सदर्हू आक्टाच्या १६ व्या व १७ व्या कलमांच्या ऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

बुकें न दिल्याबद्दल अगर छापणारास नकाशे न पुरविल्याबद्दल शिक्षा.

"१६ या आक्टाचे ९व्या कलमांत सांगितलेल्या प्रकारचें कोणतेहि बुकाचा जो कोणताहि छापणारा त्या कलमाबरहुकुम त्या बुकाच्या प्रती देण्यास हयगय करील त्यानें, तशा प्रत्येक चुकीबद्दल, त्या प्रती ज्या अमलदाराकडे द्यावयास पाहिजे होत्या त्या अमलदाराच्या अगर या बाबतींत त्या अमलदारानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या सूचनेवरून, तें बुक ज्या जागीं छापिलें असेल त्या जागीं हुकुमत असणारा माजिस्ट्रेट सर्व गोष्टी ध्यानांत आणून त्या चुकीबद्दल दंडादाखल वाजवी ह्मणून पन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशी जी रकम ठरवील, ती सरकारास दिली पाहिजे, आणि छापणारानें ज्या प्रती आणून द्यावयास पाहिजे होत्या, त्या प्रतींची जी किंमत तो माजिस्ट्रेट ठरवील, तिची रकम त्या दंडाशिवाय आणखी दिली पाहिजे.

"अशा कोणत्याहि छापणारास बुक छापण्याचें काम ज्यानें दिलें असेल असा जो कोणताहि प्रसिद्ध करणारा अगर इतर मनुष्य, या आक्टाच्या ९ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें त्या छापणारास, त्यास त्या कलमाच्या ठरावांअन्वयें वागतां यावें यासाठीं त्यास जरूर असतील ते नकाशे, छाप अगर चित्रें देण्याची हयगय करील, त्या प्रसिद्ध करणारानें अगर इतर मनुष्यानें, तशा प्रत्येक चुकीबद्दल, सदर्हू प्रकारच्या सूचनेवरून सदर्हू प्रकारचा माजिस्ट्रेट, सर्व गोष्टी ध्यानांत आणून त्या चुकीबद्दल दंडादाखल वाजवी ह्मणून पन्नास रुपयांपेक्षां जास्त नांहीं अशी जी रकम ठरवील, ती सरकारास दिली पाहिजे, आणि त्या प्रसिद्ध करणारानें अगर इतर मनुष्यानें त्या छापणारास जे नकाशे, छाप अगर चित्रें पुरविले पाहिजे होते त्यांची तो माजिस्ट्रेट ठरवील ती किंमत त्या दंडाशिवाय आणखी दिली पाहिजे.

"१७. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें सरकारास दंडादाखल देणें झालेली रकम वसूल करणें ती, दंड वसूल करण्याच्या संबंधाची जी रीत विवक्षीत काळीं अमलांत असलेल्या फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींच्या कायद्यांत सांगितली असेल त्या रीतीप्रमाणें आणि त्याच संबंधाची जी मुदत हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत सांगितली असेल त्या मुदतीच्या आंत, ती ठरविणाऱ्या माजिस्ट्रेटाच्या अगर त्याच्या स्थानापन्नाच्या वारंटाबरहुकुम वसूल करण्याचा अख्त्यार आहे. दंडाबद्दल देणें झालेल्या रकमा वसूल करणें व त्यांची व दंडाच्या रकमांची व्यवस्था करणें.

"या आक्टाच्या या भागाखालीं झालेले सर्व दंड अगर दंडादाखल दिलेली रकम, हीं वसूल झाल्यानंतर त्यांची व्यवस्था स्थानिक सरकार वेळोवेळीं फर्मावील त्याप्रमाणें करावी."

६. सदर्हू आक्टाच्या १८व्या कलमांत "या आक्टाचे ९ वे कलमाअन्वयें" या मजकुराऐवजीं "या आक्टाचे ९ वे कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील (अ) रकमेअन्वयें" हा मजकूर दाखल करावा; आणि "वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक बुकाच्या प्रती दिल्यावर" या मजकुराऐवजीं "कलम ९ याच्या पहिल्या पारिग्राफांतील (अ) रकमेअन्वयें प्रत्येक बुकाची प्रत दिल्यावर" हा मजकूर दाखल करावा. सन १८६७ चा आक्ट २५, कलम १८, याची सुधारणा.

७. सदर्हू आक्टाचें २२ वें कलम यावरून रद्द केलें आहे. सन १८६७ चा आक्ट २५ कलम २२, हें रद्द केलें आहे.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:--

## सन १८९० चा आक्ट ११ वा.

### जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्याविषयीं आक्ट.

जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्यासाठीं विद्यमान कायद्याखेरीज आणखी ठराव करणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:--

सरनामा, व्याप्ति व सुरुवात, आणि दुसरे कायदे रद्द करणें.

१. (१) या आक्टास सन १८९० चा जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्याविषयीं आक्ट असें ह्मणावें.

(२) हें कलम सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहे: आणि या आक्टाचा बाकी राहिलेला सर्व किंवा कोणताहि भाग, स्थानिक सरकार, सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन, त्यास योग्य वाटेल तशा कोणत्याहि प्रदेशास, तें सरकार अशा जाहिरनाम्याच्या द्वारें जी तारीख नेमील त्या तारिखेरोजीं व त्या तारिखेपासून लागू करण्यास मुख्त्यार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वयें या आक्टाचा कोणताहि भाग कोणत्याहि प्रदेशास लागू केला जाईल तेव्हां, जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्याविषयीं जो कोणताहि इतर कायदा त्या प्रदेशांत अमलांत असेल त्या सगळ्या कायद्याचा अगर त्याच्या कोणत्याहि भागाचा अमल, केलेलें कोणतेंहि कृत्य अगर केलेला कोणताहि अपराध अगर देणें झालेला कोणताहि दंड अगर गुन्हेगारी अगर सुरू झालेलें कोणतेंहि काम यांच्या बाबतींत खेरीज करून, त्या प्रदेशांत बंद राहील असा, सरकारी गझेटांत जाहिरनामा देऊन, हुकुम करण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे; आणि असा हुकुम झाल्यानंतर, स्थानिक सरकार तसाच जाहिरनामा देऊन पुन: त्याविरुद्ध फर्मावी तोंपर्यंत, त्या सगळ्या कायद्याचा अगर त्याच्या त्या भागाचा अंमल तसा बंद राहील.

(४) पोट-कलम (२) अगर पोट-कलम (३) याखालील कोणताहि जाहिरनामा रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा स्थानिक सरकारस अख्त्यार आहे.

व्याख्या.

२. विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर या आक्टांत--

(१) "जनावर" या शब्दाचा अर्थ पाळलेलें अगर पकडलेलें जनावर असा समजावा; आणि

(२) "रस्ता" या शब्दांत, सर्व लोकांना जेथें जाण्याची मोकळीक आहे असा रहदारीचा अगर बिनरहदारीचा कोणताहि मार्ग, सडक, गल्ली, चवाठा, चौक, अळी, वाट अगर उघडी जागा यांचा समावेश होतो असें समजावें.

सार्वजनिक जागांत जनावरांचा छळ केल्याबद्दल आणि निष्कारण छळ करून मारिलेलीं जनावरें अशा जागीं विकण्याबद्दल शिक्षा.

३. जो कोणताहि मनुष्य, कोणत्याहि रस्त्यांत अगर सर्व लोकांना जेथें जाण्याची मोकळीक आहे अशा इतर कोणत्याहि मोकळ्या अगर बंद केलेल्या जागेंत, किंवा कोणत्याहि रस्त्यामधल्या अगर तशा कोणत्याहि इतर जागेंतल्या कोणत्याहि मनुष्याच्या दृष्टीस पडे अशा ठिकाणीं--

(अ) कोणत्याहि जनावरास निर्दयपणें व विनाकारण मारील, शक्तीबाहेर हांकील, वाजवीपेक्षां जास्त लादील अगर इतर प्रकारें वाईट रीतीनें वागवील, अगर

(ब) जनावरास विनाकारण वेदना अगर दुःख होई अशा रीतीनें अगर अशा स्थितींत त्यास बांधील अगर नेईल, अगर

(क) छिन्नविच्छिन्न केल्यामुळें, उपासमार केल्यामुळें अगर इतर प्रकारें वाईट रीतीनें वागविल्यामुळें ज्यास वेदना होत आहेत असें कोणतेंहि जीवंत जनावर, अगर निष्कारण छळक रीतीनें मारलें आहे असें वाटण्यास त्याला कारण असेल तसें कोणतेंहि जनावर विकावयास काढील, मांडील अगर जवळ ठेवील,

त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची अगर तीन महिन्यांच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे, अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

फूका करण्याबद्दल शिक्षा.

४. जो कोणताहि मनुष्य कोणत्याहि गाईवर फूकानामक क्रिया करील, त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची अगर तीन महिन्यांच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे, अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

जनावरांस कोठेंहि निष्कारण छळक रीतीनें ठार मारल्याबद्दल शिक्षा.

५. जो कोणताहि मनुष्य कोणतेंहि जनावर निष्कारण छळक रीतीनें ठार मारील, त्यास दोनशें रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची अगर साहा महिन्यांच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे, अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

मेहनत करण्यास नालायक अशीं जनावरें कोणत्याहि ठिकाणीं कामावर लावल्याबद्दल शिक्षा.

६. (१) जो कोणताहि मनुष्य, जें कोणतेंहि जनावर कोणत्याहि रोगामुळें, अशक्ततेमुळें, जखमेमुळें, क्षतामुळें अगर इतर कारणामुळें जें काम अगर मेहनत करण्यास नालायक असेल, त्यास तें काम अगर मेहनत करावयास लावील, किंवा आपल्या कबजांतील अगर ताब्यांतील अशा कोणत्याहि नालायक जनावरास तें काम अगर मेहनत करावयास लावूं देईल, त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) याविरुद्ध ज्या जनावरांच्या संबंधानें अपराध केले असतील त्यांस औषधोपचार करण्याकरितां व त्यांच्या जतनेकरितां इसपितळें ह्मणून स्थळें, सामान्य अगर विशेष हुकुम फर्मावून, नेमून देण्याचा स्थानिक सरकारास अखत्यार आहे.

(३) ज्या माजिस्ट्रेटापुढें अशा कोणत्याहि अपराधाबद्दल फिर्याद मांडली असेल त्यास, ज्या जनावराच्या संबंधानें असा अपराध केला असल्याबद्दल ह्मणणें असेल अगर शाबिती झाली असेल त्याला औषधोपचारासाठीं व जतनेसाठीं सदहू प्रकारच्या एखाद्या इसपितळांत पाठवून देण्याविषयीं आणि ज्या कामावर अगर मेहनतीवर त्यास साधारणतः लावण्यांत येत असेल तें काम अगर मेहनत करण्याला तें पुनः अशा माजिस्ट्रेटाच्या अगर इतर कोणत्या तरी माजिस्ट्रेटाच्या मतें लायक होई तोंपर्यंत तेथें ठेवून घेण्याविषयीं हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

(४) जनावर इसपितळांत असतांना त्याच्या औषधोपचारांबद्दल, खाण्याबद्दल व त्याला पाणी पाजण्याबद्दल येणारा खर्च त्याच्या मालकानें जिल्हा-माजिस्टेट किंवा, इलाका-शहरांत असें इसपितळ असेल ह्या प्रसंगीं, पोलीस कमिशनर वेळोवेळीं जे दराचें मान ठरवील त्या मानानें, दिला पाहिजे.

(५) जर असा मालक असा खर्च देण्याविषयीं व माजिस्ट्रेट नेमील त्या मुदतीच्या आंत असें जनावर घेऊन जाण्याविषयीं इनकार अगर हयगई करील, तर असें जनावर विकून त्या विक्रीपासून होणारें उत्पन्न अशा खर्चाच्या भरपाईकडे लावण्याविषयीं हुकुम करण्याचा अशा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

(६) सदहू विक्रीपासून झालेल्या उत्पन्नापैकीं कांहीं रकम फाजील राहिल्यास ती, अशा विक्रीच्या तारिखेनंतर दोन महिन्यांच्या आंत सदहू मालकानें अर्जी केली असतां, त्याला दिली पाहिजे, परंतु असा मालक अशा विक्रीपासून झालेल्या उत्पन्नाहून जास्त रकम देण्यास पात्र होणार नाहीं.

७. जो कोणताहि मनुष्य आपल्या मालकीच्या कोणत्याहि जनावरास स्पर्शजन्य अगर सांसार्गीक रोग झालेला असतांना त्यास कोणत्याहि रस्त्यांत जाणूनबुजून मोकळें सोडील, अगर रोग झालेल्या किंवा अशक्त झालेल्या आपल्या मालकीच्या कोणत्याहि जनावरास वाजवी कारणाशिवाय कोणत्याहि रस्त्यांत मरूं देईल, त्यास शंभर रूपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे. रोग झालेल्या जनावरांस सार्वजनिक जागेंत मोकळें सोडण्याबद्दल अगर मरूं देण्याबद्दल शिक्षा.

८. (१) जर पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास, पोट-तुकडी माजिस्ट्रेटास, पोलीस कमिशनरास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस यास लेखी बातमी मिळाल्यावरून व त्यास जरूर वाटेल ती चौकशी त्यानें केल्यावर, कोणत्याहि जागीं कलम ४, कलम ५ अगर कलम ६ याविरुद्ध अपराध केला जात अगर केला जाण्याच्या बेतांत आहे अगर करण्यांत आला आहे असें मानण्यास त्यास कारण असेल तर तो, अशा जागेंत स्वतः शिरून तिचा झाडा घेण्यास किंवा आपल्या वारंटावरून कान्स्टेबलाहून वरिष्ठ दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास त्या जागेंत शिरून तिचा झाडा घेण्याविषयीं अधिकार देण्यास मुखत्यार आहे. झाडा घेण्याचीं वारंटें.

(२) सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाअन्वयें घ्यावयाच्या झाड्यांच्या संबंधाचे त्या कोडांतील ठराव, ते लागू करितां येतील तेथवर, पोट-कलम (१) अन्वयें घ्यावयाच्या झाड्यांस लागू राहतील असें समजावें.

९. या आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दलची फिर्याद, तो घडल्याच्या तारिखेपासून तीन महिन्यानंतर करूं नये. फिर्यादीच्या मुदतीची इयत्ता.

१०. जेव्हां कोणत्याहि माजिस्ट्रेटास, पोलीस कमिशनरास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस यास कोणत्याहि जनावराच्या संबंधानें या आक्टाविरुद्ध अपराध घडला आहे असें मानण्यास कारण असेल, तेव्हां अशा जनावराच्या यातनांवरून त्यास तात्डतोब ठार मारण्याविषयीं हुकुम देणें योग्य होईल असें जर त्याला वाटेल तर त्याला तसा हुकुम देण्याचा अखत्यार आहे. पीडा होत असणाऱ्या जनावरांचा नाश करणें.

११. या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून, कोणत्याहि जातीच्या, पंथाच्या, कोमाच्या अगर वर्गाच्या लोकांच्या धर्मावरून अगर धर्मसंबंधी विधि व चाली यांवरून जरूर असल्याप्रमाणें कोणत्याहि जनावरास मारणें हा अपराध होतो असें समजूं नये. धर्मसंबंधीं विधि व चाली यांबाबद बचाव.

१२. कलम १ यांत कोणताहि ठराव असला तथापि कलमें ९, १० व ११ हीं, ज्या प्रदेशांत अपराधाबदलचें या आक्टांतील कोणतेंहि कलम त्या त्या वेळीं अमलांत असेल तशा दरेक प्रदेशास लागू होतील असें समजावें. या आक्टाच्या व्याप्तीसंबंधीं १ ल्या कलमाच्या पुरवणीदाखल ठराव.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २८ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९० चा आक्ट १३ वा.

**सन १८८१ चा एक्सैस आक्ट व सन १८७८ चा बंगालचा एक्सैस आक्ट हे सुधारण्याबाबत, आणि सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट यांतील गाळलेल्या दारूसंबंधीं कांहीं ठराव माल्टपासून काढलेल्या दारूस लागू करण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थीं सन १८८१ चा एक्सैस आक्ट व सन १८७८ चा बंगालचा एक्सैस आक्ट हे सुधारणें आणि सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट यांतील गाळलेल्या दारूसंबंधी कांहीं ठराव माल्टपासून काढलेल्या दारूस लागू करणें योग्य आहे, त्याअर्थीं हल्लीं येणेंप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९० चा एक्सैस (माल्ट दारूचा) आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

[कलमें २—८ मुंबई इलाक्यास लागू नाहींत.]

**माल्ट-दारू बाहेर पाठवितांना एक्सैसचे ड्यूटीची ड्राब्याक.**

सन १८७८ चा आक्ट, ८ कलम १५० यांतील ठराव माल्टदारूस लागू करणें.

९. ब्रिटिश इंडियांत तयार केलेली असून जी पारके बंदरास पाठविली असेल अशा गाळलेल्या दारूवर भरलेल्या एक्सैसचे ड्यूटीची ड्राब्याक देण्याबाबदचे आणि अशा गाळलेल्या दारूच्या परिमाणावरून अशी ड्राब्याक ठरविण्याबाबदचे, सन १८७८ च्या जलमार्गाचे कस्टम्सच्या आक्टाच्या १५० व्या कलमांतील ठराव, ते लागू करतां येतील तेथवर, माल्टपासून ब्रिटिश इंडियांत काढून पारके बंदरास पाठविलेली फर्मेंटेड दारू व अशा दारूवर भरलेल्या एक्सैसचे ड्यूटींची ड्राब्याक यांसही लागू होतील असें समजावें.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.